# के.पी.जी. कला ,वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, ईगतपुरी.

## कनिष्ठ महाविद्यालयाचा अहवाल

( शैक्षणिक वर्ष २०२० -२०२१ )

**प्रा.श्री.फाकटकर एस.बी ( पर्यवेक्षक – कनिष्ठ महाविद्यालय )**

आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २००० – २०२१ मध्ये एकूण ७०५ इतक्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला तो खालील इयत्ता व शाखेनुसार :

● विद्यार्थी प्रवेश ●

| **इयत्ता व शाखा** | **एकूण विद्यार्थी** |
|---|---|
| इ. ११वी कला | १३० |
| इ.११वी वाणिज्य | १३१ |
| इ.११वी विज्ञान | १२८ |
| इ. १२वी कला | १०९ |
| इ.१२वी वाणिज्य | ११० |
| इ.१२वी विज्ञान | ९७ |
| **एकूण** | **७०५** |

मागील शैक्षणिक वर्षात राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने घेतलेल्या परीक्षेत इयत्ता बारावीचा निकाल शाखे नुसार खालील प्रमाणे :

### ● इयत्ता 12 वी निकाल ●

| **इयत्ता व शाखा** | **%निकाल** |
|---|---|
| इ. १२वी कला | 100% |
| इ.१२वी वाणिज्य | 100% |
| इ.१२वी विज्ञान | 100% |
| **एकूण निकाल** | 100% |

शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ मध्ये इयत्ता अकरावी व इयत्ता बारावी विविध शाखेत प्रथम आलेले विद्यार्थी खालीलप्रमाणे:

## ● इयत्ता व शाखेनुसार प्रथम आलेले विद्यार्थी ●

| इयत्ता व शाखा | विद्यार्थ्याचे नाव | एकूण टक्के |
|---|---|---|
| इ. ११वी कला | कु.काळे अक्षदा प्रकाश | ७४.00 |
| इ.११वी वाणिज्य | कु.कासार निकिता भाऊसाहेब | ७९.३३ |
| इ.११वी विज्ञान | कु.पठाण महेक रफिक | ८८.६७ |
| इ. १२वी कला | कु.गोवर्धने प्रियंका भाऊसाहेब | ७८.३ |
| इ.१२वी वाणिज्य | कु. बोडके गौरी अशोक | ८३.८ |
| इ.१२वी विज्ञान | कु.कौटे पल्लवी हरी | ८४.८३ |

शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ मध्ये कोरोनाग्रस्त परिस्थितीमुळे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना तालुका, जिल्हा व राज्य पातळीवरील विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन न झाल्यामुळे विविध स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी अनेक अडचणी आल्या असल्या तरी महाविद्यालयातील क्रीडांगणावर विविधखेळाडूंना आपल्या विविध खेळातील कौशल्यटिकून ठेवण्यास माननीय प्राचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा शिक्षकांनी प्रोत्साहन देऊन भविष्यातील तालुका, जिल्हा व राज्य तसेच राष्ट्रीय पातळीवरील विविध खेळांमधील सहभाग वाढवण्याची प्रेरणा या काळामध्येही ठेवलेली आहे. त्याचा महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक व क्रीडा शिक्षकांना आनंदच वाटत आहे.

शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ मध्ये महाविद्यालयाअंतर्गत व बाह्य ज्या विविध सांस्कृतीक स्पर्धा झाल्या त्यात कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी खालील प्रमाणे यश प्राप्त केले.

**चित्रकला स्पर्धेम**ध्ये कु.रोकडे मयुर अजय (इ. १२वी वाणिज्य) तर **वकृत्व स्पर्धेमध्ये** कु.कासार निकिता भाऊसाहेब ( इ. ११ वी वाणिज्य) कु. गोवर्धने मोनिका तानाजी ( इ. ११वी विज्ञान ) कु. गोवर्धने प्रियांका भाऊसाहेब (इ. १२ वी कला ) ह्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. तर **निबंध स्पर्धेत** प्रथम क्रमांक कु. सकभोर दीव्या काळू ( इ. ११ वी कला ) कु.चिकने अश्विनी संजय दृतिय क्रमांक ( इ. ११ वी कला ) तर तृतीय क्रमांक कु. रंगरेज आफ्रीन रफिक (इ. ११ वी विज्ञान) तसेच **राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियानाअंतर्गत** कु. अंजली सिंग प्रथम क्रमांक (इ.११ वी विज्ञान ) कु. किरण शिंदे दृतिय क्रमांक ( इ. ११वी कला ) तर कु. निर्मला लोहारे (इ. ११ वी विज्ञान ) तृतीय क्रमांक या स्पर्धेत पटकावला.

कु.अंजली सिंग (इयत्ता ११ वी विज्ञान ) या शाखेच्या विद्यार्थ्यांनीने आंतरराष्ट्रीय गणित दिनानिमित्त आयोजित पाँवर पॉइंट प्रेझेंटेशन कॉम्पिटिशन मध्ये उज्वल यश संपादन केले ह्या विद्यार्थिनीने **'आंतरराष्ट्रीय गणित दिनानिमित्त'** आयोजित गणिताचे विविध क्षेत्रातील **उपयोजन** स्पर्धेत **प्रथम क्रमांक** मिळविला आपले उज्वल यश संपादन केले तर कु. कोकाटे विकास निवृत्ती ( इयत्ता ११ वी विज्ञान ) या विद्यार्थ्यांने राज्यस्तरीय **'कला उत्सव- चित्रकला'** स्पर्धेत सहभाग नोंदवून **जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक** मिळविला आहे.

तर कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांनी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे आयोजित २०२० इयत्ता बारावी पुनर्रचित अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके मूल्यमापन आराखडा ,घटक निहाय गुण विभागणीइत्यादी संदर्भातील ऑनलाइन प्रशिक्षणात प्रशिक्षणार्थी म्हणून सहभागी झाले होते. आप-आपल्या विषयाचे सखोल आणि अभ्यास पूर्ण प्रशिक्षण घेतले आहे. व त्या संबंधित बोर्डाचे प्रमाणपत्र देखील प्राप्त केले आहे.

महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य डॉ. पी. आर. भाबड यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रेरणेनुसार कनिष्ठ महाविद्यालयाचे कामकाज ऑनलाइन पद्धतीने होण्यासाठी ज्या सुख- सुविधा लागतात त्या सर्व सुविधा आम्हाला माननीय प्राचार्य साहेबांनी या शैक्षणिक वर्षात उपलब्ध करून दिल्या आहेत तसेच परीक्षा विभागाचे सुद्धा संगणकीकरन करून परीक्षा विभागासाठी लागणारे कपाटे-टेबल-खुर्ची व इतर साहित्य उपलब्ध केल्यामुळे कनिष्ठ विभागाचे कामकाजाला आधुनिकीकरण व संगणकीकरणाची साथ मिळाल्यामुळे कनिष्ठ विभागाचे कामकाज जलद गतीने होण्यास निश्चितच मदत झाली आहे. तसेच माननीय प्राचार्य साहेबांनी आदिवासी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना हवे तेव्हा जे पुस्तके लागतील ते तात्काळ उपलब्ध होण्यासाठी पुरेशा संख्येने इयत्ता अकरावी व इयत्ता बारावीच्या सर्व विषयाची पुस्तके ग्रंथालयात उपलब्ध करून दिली आहेत. त्याचा उपयोग अनेक विद्यार्थी करून येत आहेत आणि आपली शैक्षणिक प्रगती साध्य करून घेत आहेत.याचा कनिष्ठ विभागातील सर्व विद्यार्थी- शिक्षकांना निश्चितच आनंद वाटतो.

शैक्षणिक वर्ष २०२०- २१ मध्ये कनिष्ठ महाविद्यालय अंतर्गत परीक्षा विभागाचे प्रमुख म्हणून प्रा.चव्हाण एस. एम.तर परीक्षा सहाय्यक म्हणून प्रा. जाधव बी.एम.यांनी कामकाज पाहिले तर एच. एस. सी. बोर्डाची परीक्षा नोव्हेंबर- डिसेंबर २०२० परीक्षा केंद्रप्रमुख म्हणून प्रा.गायकवाड आर.व्ही.तर उपकेंद्रप्रमुख म्हणून फाकटकर एस.बी. तर स्टेशनरी सुपरवायझर म्हणून श्री. गायकवाड आर. एस. यांनी कामकाज पाहिले तर इयत्ता बारावी निकाल समितीचे प्रमुख म्हणून प्रा.वाघ ए.एस. यांनी कामकाज पाहिले.

शैक्षणिक वर्ष २०२०- २१ मध्ये कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर विविध कामकाज समितीचे प्रमुख म्हणून खालील शिक्षकांनी कामकाज पाहिले आहे.

**१) शिक्षक - पालक संघ –** श्रीमती व्ही. आर. कोकाटे , श्री.गायकवाड आर. व्ही. कै.फुलारे पी. एस. श्री. कोल्हे जी.एस.

**२) शालेय व्यवस्थापन समिती** – श्रीमती व्ही. आर. कोकाटे , श्री. फाकटकर एस.बी.

**३) शालेय शिस्त व सुरक्षा समिती** – श्री. जाधव बी. एम. , श्री.फाकटकर एस.बी., कै.फुलारे पी. एस. श्री.कोल्हे जी.एस.

४) **परिवहन समिती व मुलींची मोफत पास योजना** – कै.फुलारे पी. एस. श्री.गायकवाड डी. एस.

५) **माता -पालक संघ -** श्रीमती काळे एस.टी. , श्रीमती एस. एन. थेटे

६) **विशाखा समिती –** श्रीमती सौंदाणे जी. एस. , श्रीमती एस. एन. थेटे

७) **विविध शालेय उपक्रम समिती** - श्रीमती पाटील ए. एस. , श्री. चव्हाण एस. एम.

८) **रोव्हर/ रेंजर समिती** – श्रीमती पाटील ए. एस. , श्री निकम बी. एम.

९) **शालेय क्रीडा समिती** – कै.फुलारे पी. एस. , श्री.गायकवाड आर. एस.

**१०) जुनिअर विभाग ऑनलाइन कामकाज समिती** – श्री. वाघ. ए. एस. , श्री गायकवाड डी. एस.

**११) माहिती व प्रसिद्धी समिती** - – श्री. वाघ ए. एस. , श्री. गायकवाड. डी. एस.

**१२**) **जूनियर कॉलेज स्टाफ सेक्रेटरी व पर्यवेक्षक** - श्री. फाकटकर एस. बी.

कनिष्ठ महाविद्यालय कामकाजाला ज्युनियर विभागाचे क्लार्क श्री.थवील जी.बी. तसेच कार्यालयीन प्रमुख श्री.कमाणकर भाऊसाहेब, श्री.मालुंजकर भाऊसाहेब, तशेच श्री.दिनेश गोसावी व सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य आम्हाला कायम लाभत आले आहे.

धन्यवाद…….!!

**प्रा.फाकटकर एस.बी.**

**( पर्यवेक्षक – कनिष्ठ महाविद्यालय )**